# निवडणूक समन्वयकांसाठी मार्गदर्शक सूचना

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादया तयार करणे व प्रत्यक्ष निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण भारतीय संविधानाच्या कलम २४३ के मधील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेले आहे. राज्य निवडणूक आयोगा मार्फत नेमणूक केलेल्या निवडणूक समन्वयकांनी खालीलप्रमाणे जबाबदारी पार पाडावी अशी आयोगाची अपेक्षा आहे.

**१) निवडणूक समन्वयकांची पहिली भेट :**

(i) निवडणूक समन्वयक यांनी नेमून दिलेल्या जिल्हयात, नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यापासून कमाल सात दिवसांत पहिली भेट द्यावी.

(ii) निवडणूक समन्वयक यांनी जिल्हयातील सर्व संबंधितांची बैठक घेऊन त्यात निवडणुकीबाबत सविस्तर माहिती प्राप्त करुन घ्यावी. विशेषतः जिल्हाधिकारी यांनी **जिल्हयाची माहिती पुस्तिका** तयार करुन द्यावी.

(iii) निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती, त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी व इतर सर्व बाबतीत खातरजमा करुन घ्यावी.

२) **मतदान केंद्रांचा आढावा** घेताना राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भात काढलेल्या आदेशांचे ततोतंत पालन होत आहे याबाबत खातरजमा करुन घेणे .(प्रत सोबत जोडली आहे.) उदा.:

(i) मतदान केंद्राची निवड.

(ii) मतदान केंद्रनिहाय सरासरी मतदार, एकूण मतदारांची संख्या, सर्वाधिक मतदार असलेल्या मतदान केंद्राचा तपशील, सर्वात कमी मतदार असलेल्या मतदान केंद्राचा तपशील.

(iii) **मतदान केंद्रावर** दिल्या जाणा-या **सोयीसुविधा** विशेषतः वृध्द, अपंग व गरोदर स्त्रिया यांच्यासाठी आवश्यक असणा-या सुविधांचा तपशील.

(iv) पक्की इमारत असलेल्या मतदान केंद्रांचा तपशील.

(v) मतदान केंद्रांची आवश्यक ती दुरुस्ती झाली किंवा कसे, तसेच मतदान केंद्रापर्यंत पोहोचरस्ता आहे किंवा नाही याचा आढावा घेऊन विशेषतः पावसाळयात करण्यात आलेली उपाययोजना व पर्यायी व्यवस्था यांचा तपशील.

(vi) संवेदनशील मतदान केंद्राबाबतचा तपशील.

३) **मतदार यादीबाबत आढावा** घेताना राज्य निवडणूक आयोग यांनी याबाबत निर्गमित केलेल्या आदेशांचे तंतोतंत पालन झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करावी.

(i) अधिसूचित तारीख, अंतिमरित्या प्रसिध्द झालेली मतदार यादी, अधिप्रमाणित केलेल्या मतदार यादीचा आढावा.

(ii) मयत, स्थलांतरीत, दुबार नाव असलेल्या मतदारांबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा.

(iii) निवडणूक समन्वयकांनी आपल्या मतदार संघातील आपला संपर्काचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक फॅक्स क्रमांक इत्यादी बाबतच्या माहितीला पुरेशी प्रसिध्दी देण्याच्या सूचना निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हाधिकारी व सर्व तहसिलदार यांना द्याव्यात, जेणेकरुन नागरिकांच्या तक्रारी निवडणूक समन्वयक यांना मिळू शकतील व अशा तक्रारींमध्ये लक्ष घालण्याच्या सूचना संबधितांना देणे शक्य होईल.

(iv) मतदारांच्या तक्रारींना त्वरित न्याय देण्यासाठी **नियंत्रण कक्ष** तहसिल / जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष तयार करण्यात आले आहेत याची खातरजमा करणे.

**४) आचारसंहिता :**

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आचासंहितेची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे (विशेषत:२४ डिसेंबर, २००७ चे एकत्रित आदेश) तंतोतंत पालन केले जात आहे याची खात्री करावी. (प्रत सोबत जोडली आहे.)

(ii) धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेतली किंवा कसे याचा आढावा.

(iii) शासकीय विश्रामगृहे, शासकीय वाहने यावरील बंधने, राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठीचे आदर्श आचारसंहितेचे संबंधितांकडून पालन होते किंवा कसे यावर लक्ष ठेवणे.

(iv) आवश्यक तेव्हा राजकीय पक्षांची बैठक बोलावून आढावा घेणे.

**(५) कायदा व सुव्यवस्था-**

(i) जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, पोलिस आयुक्त / जिल्हा पोलिस अधीक्षक यांची बैठक घेवून कायदा व सुव्यवस्थेचा सविस्तर तपशील घेणे व एकत्रित माहिती पुस्तिका उपलब्ध करुन घेणे.

(ii) **संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची यादी** तयार करण्यात आली आहे, तसेच सदर यादी पोलीस यंत्रणा व जिल्हा प्रशासनाकडे आहे याची खातरजमा करणे.

(iii) जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस यंत्रणा यांच्यास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत याबाबत तसेच नियंत्रण कक्षात ठेवण्यात आलेल्या नोंदणीची तपासणी व आलेल्या तक्रारींवर केलेल्या कार्यवाहिचा आढावा घेणे.

(iv) **मद्यविक्रीवरील बंदी, शस्त्र जमा** करण्याबाबत (Arms deposition), मतदारांवर व निवडणुकींवर प्रभाव टाकणारे घटक याबाबत जिल्हादंडाधिकारी आणि जिल्हा अधीक्षक यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

(v) **नक्षलग्रस्त भागात** व आवश्यक त्या ठिकाणी पुरेसा **पोलीस बंदोबस्त** अथवा राखीव पोलीस दलाच्या तुकड्या उपलब्ध आहेत याची खातरजमा करावी.

**६) मतदान यंत्राबाबतचा तपशील :**

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करुन मतदान करण्यासंदर्भात सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबतचे राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक २८ मार्च, २००७ चे आदेश व वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन होते किंवा कसे याचा आढावा घेणे.

(ii) मतदान यंत्रे व इतर साहित्याची पुरेशा प्रमाणात उपलब्धता तसेच मतदान यंत्रांबाबत प्रशिक्षणाचा आढावा घेणे.

(iii) मतदारासाठी मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबत करण्यात आलेली जनजागृती, प्रशिक्षण, त्यासंदर्भात असलेल्या नियंत्रण कक्षांचा संपर्क क्रमांक व त्याची प्रसिध्दी देणेबाबत आढावा घेणे.

(iv) मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करताना घेण्यात आलेली दक्षता व त्याचे चित्रिकरण प्रसिध्दी माध्यमाद्वारे करण्यात आले किंवा कसे, राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून आलेल्या प्रतिक्रियांचा आढावा

(v) मतदान यंत्रे सुरक्षित ठेवण्याबाबत तयार केलेल्या व्यवस्थेची पहाणी.

**७) मतदार जागृती मोहिम :**

(i) जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा पोलीस यंत्रणा यांनी मतदार जागृती मोहिमेअंतर्गत

केलेल्या विशेष कामाचा आढावा घ्यावा.

(ii) जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, जिल्हा पोलीस कार्यालयामध्ये मतदार जागृतीसंदर्भात नियंत्रण कक्ष स्थापन करणे. नियंत्रण कक्षाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहींचा तपशील.

(iii) वृत्तपत्रे, केबल वाहिन्या, रेडिओ, इंटरनेट, पत्रक इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे मतदार जागृतीसाठी केलेल्या प्रयत्नाचा आढावा.

(iv) ग्रामीण भागात तसेच इतर ठिकाणी मतदारांना मतदानयंत्र हाताळणीसाठी तयार केलेले नमुना मतदान केंद्र व अन्य पध्दतीच्या विशेष उल्लेखनीय प्रयत्नांचा तपशील

**(v) मतदार जागृती मोहिमेत इतर यंत्रणा जसे सेवाभावी संस्था, विनाअनुदानित तसे अशासकीय स्तरावरील व्यक्तिंचा सहभाग** घेऊन मोहिम व्यापक करण्याबाबत करण्यात आलेले विशेष प्रयत्नांचा आढावा.

**८) निवडणूक समन्वयकांची दुसरी भेट**

निवडणूक समन्वयकांच्या दुसऱ्या भेटीचा कालावधी मतदानाच्या दिवसाच्या दोन दिवस आधी सुरु होईल व मतमोजणी प्रक्रिया पार पडल्यानंतर हा कालावधी संपुष्टात येईल, म्हणजेच निवडणूक समन्वयकांनी त्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात थांबून मतदान केंद्रांना भेटी द्याव्यात.

**९) मतमोजणीबाबत :**

(i) मतमोजणीचे ठिकाण व ते सुरक्षित आहे याबाबत आढावा.

(ii) **मतदान पार पडल्यानंतरचा अहवाल** आयोगास सादर करणे.

(iii) मतमोजणीचा तपशील : मतमोजणीचा अहवाल सबंधित यंत्रणेकडून वेळेवर पाठविला जात आहे यावर लक्ष ठेऊन काही अनियममितता आढळून आल्यास निवडणूक निकाल जाहीर करण्यापूर्वी तात्काळ आयोगाच्या नियंत्रण कक्षास कळवावे.

**१०) अनुदान :**

निवडणूक समन्वयक यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांना सदर निवडणुकीकरिता आवश्यक अनुदान प्राप्त झाले याबाबत तपशील घ्यावा.

**११) अहवाल : मतमोजणी पार पाडल्यानंतर** निवडणुकीबाबत आपला संपूर्ण **अहवाल** राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

**१२) संपर्कासाठी दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :-**

| | |
|---|---|
| श्री. मंगेश मोहिते, सहायक आयुक्त | ९८६९४२८४३३/२२०२७७३७ |
| श्रीमती. आरती सरवदे, तहसिलदार | ९८३३७१३३०२/२२०४५०७५ |
| कार्यालयीन क्रमांक | ०२२-२२८४६७२० |
| फॅक्स क्रमांक | ०२२-२२०४६९०९/२२८४६७२१/१९ |

ई-मेल- stateelectioncommission@gmail.com
वेबसाईट-stateelection.maharashtra.gov.in

------------------------